Estd 1962

Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## १५/९/२०२१

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग तसेच संलग्नित महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठीची **पदव्युत्तर प्रवेश परीक्षेचे आयोजन** दि.११, १२, १३ व १५ सप्टेंबर २०२१ रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव या जिल्हयातील एकुण ११ परीक्षा केंद्रावर करण्यात आले आहे.

आज दि.१५ सप्टेंबर २०२१ रोजी **एम.एस्सी– अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बी.एस्सी./एम.एस्सी.–नॅनो सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, एम.बी.ए.– रुरल मॅनेजमेंट, एम.बी.ए. डिस्टन्स मोड** इ. अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा पार पडल्या.

आज एकुण ९८५ विद्यार्थ्यांपैकी ७३६ इतक्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. प्रवेश परीक्षेस उपस्थित राहण्याचे विद्यार्थ्यांचे प्रमाणे हे शेकडा ७४.७२ टक्के इतके होते. सदरची परीक्षा ही तीन सत्रामध्ये सुरळीतपणे पार पडली.

त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या असून **आज दि. १५ सप्टेंबर २०२१ रोजी** B.Sc./M.Sc. (Nano Sc. and Technology) या अभ्यासक्रमाची परीक्षा पार पडली.

आजच्या या परीक्षेसाठी १२१ विद्यार्थ्यांपैकी १२१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

आज दि.१५ सप्टेंबर २०२१ रोजी खालील एकुण ३० परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले व आजपर्यंत एकुण १४१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बी.व्होक.– फूड प्रोसेसिंग अ‍ॅन्ड मॅनेजमेंट– सेमि.६ | २ | एम.ए.–मराठी – सेमि.–३ व ४ |
| ३ | एम.ए.–इंग्रजी – सेमि.–३ व ४ | ४ | एम.ए.– हिंदी – सेमि.–३ व ४ |
| ५ | एम.ए.– राज्यशास्त्र – सेमि.–३ व ४ | ६ | बी.आय.डी.– सेमि. ३ व ४ |
| ७ | एम.कॉम. – सेमि.– ३ व ४ | ८ | बी.टेक.–सेमि.– ५ व ६ |
| ९ | एम.एस्सी. – बॉटनी – सेमि.३ व ४ | १० | एम.एस्सी. – ज्युऑलॉजी – सेमि.३ व ४ |
| ११ | एम.एस्सी. – अ‍ॅग्रो केमिकल अ‍ॅन्ड पेस्ट मॅनेजमेंट – सेमि.३ व ४ | १२ | एम.एस्सी. – जनरल मायक्रोबॉयॉलॉजी – सेमि.३ व ४ |
| १३ | एम.सी.ए.– सेमि.– ५ व ६ | १४ | डिप्लोमा इन लेबर लॉ |
| १५ | डिप्लोमा इन सायबर लॉ | १६ | पी.जी.डिप्लोमा इन हयुमन राईटस् व्हॅल्यू इन एज्युकेशन |
| १७ | एम.ए./एम.एस्सी.–ज्युऑग्राफी सेमि.– ३ व ४ | | |

काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची पुनर्रपरीक्षा घेण्यासाठी दि.९ सप्टेंबर २०२१ अखेर विद्यार्थ्यांना लिंक उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्यानुसार एकुण ८८४५ विद्यार्थ्यांनी लिंकद्वारे पुनर्रपरीक्षा घेण्याबाबतची माहिती विद्यापीठास कळविली आहे. या विद्यार्थ्यांची पुनर्रपरीक्षा उद्या दि.१६ सप्टेंबर २०२१ पासून घेण्याचे विद्यापीठ प्रशासनाने प्रयोजले आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी त्याबाबतची माहिती व सूचना विद्यार्थ्यांना त्वरित समजता याव्यात यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे संकेतस्थळ, स्वत:चा ईमेल तसेच नोंदणीकृत मोबाईल वारंवार पाहून पुढील कार्यवाही करावी तसेच अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.